**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नाशिक विभागीय मंडळ,नाशिक - 422 003**
गट/सर्व्हे न.1560/1 आडगांव शिवार, न्यु इंग्लिश स्कुल जवळ, मुंबई आग्रा रोड, नाशिक
Website-sscboardnashik.com Email-nsksec@rediffmail.com

अत्यंत महत्वाचे / परीक्षाप्राधान्य

क्र/नाविमं/ब-२/तोंडी./1270
नाशिक — ४२२००३
दिनांक— 08 /०५/२०२६
06

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व संबंधित मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार जिल्हे

**विषय :— माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा जून/जुलै २०२६ च्या तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेबाबत.....**

संदर्भ :— रा.म.पुणे यांचे क्र.रा.मं./परीक्षा—६/२०१५,पुणे —४११००४ दि.१२/०५/२०२६ रोजीचे पत्र.

माहे जून/जुलै—२०२६ च्या परीक्षेस ज्या विद्यालयांचे विद्यार्थी प्रविष्ट होत आहेत त्या शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) ची लेखी परीक्षा मंगळवार, दिनांक १६/०६/२०२६ ते मंगळवार, दिनांक ३०/०६/२०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० वी परीक्षा जून/जुलै २०२६ विज्ञान आणि तंत्रज्ञान, तंत्र व NSQF अंतर्गत पूर्व व्यावसायिक विषयांच्या प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | परीक्षा कालावधी |
| ०१. | प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी परीक्षा व अंतर्गत मुल्यमापन व NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्य. परीक्षा | मंगळवार दिनांक १६/०६/२०२६ ते मंगळवार दिनांक ३०/०६/२०२६ |

१.जून/जुलै पुरवणी परीक्षेसाठी इ.१०वी च्या प्रात्यक्षिक परीक्षा यापूर्वी प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जात होती. तथापि त्यामध्ये बदल करण्यात आला असून प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा मंगळवार दिनांक १६/०६/२०२६ ते मंगळवार दिनांक ३०/०६/२०२६ या कालावधीत आपल्या विद्यालयामध्येच आयोजित करण्यात यावी. वरील माहिती आपल्या शाळेतील विज्ञान व तंत्रज्ञान विषयाच्या शिक्षकांच्या तसेच जून/जुलै—२०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.

२. प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मुल्यमापनाचे गुण पोर्टलवर ऑनलाईन पद्वतीने पाठवावयाचे आहेत. याबाबतची लिंक आपणास यथावकाश कळविण्यात येईल.

३.परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परिक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा, आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा आऊट ऑफ टर्न (OUT OF TURN) ने आयोजित करता येणार नाही, याची आपण नोंद घेवून विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरून निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची आपण दक्षता घ्यावी.

(सरोज जगताप)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक—४२२ ००३

**प्रत —**
मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) नाशिक/जळगाव/धुळे/नंदुरबार — कृपया आपल्यामार्फत मुख्याध्यापकांच्या Whats App गृपला सदरचे पत्र पाठवावे . तसेच सदरचे पत्र www.sscboardnashik.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आले आहे.